महावितरण विद्युत वार्ता

■ वर्ष : १८ ■ अंक : ३५ ■ मे २०२६ ■ पाने : ८

# महावितरणमधील ऐतिहासिक परिवर्तन सर्वांच्याच हिताचे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन होत आहे. त्यांच्याच नेतृत्वात महावितरण कंपनीमधून कृषी व्यवसायाचे विभाजन करणे आणि महावितरणला अकृषिक कंपनी करून त्या कंपनीचे शेअर बाजारात सूचीकरण (लिस्टिंग) करण्यास मंजुरी देण्याचा खूप महत्त्वाचा निर्णय झाला आहे. महावितरण कंपनीत परिवर्तन करणारी ही घडामोड राज्यातील सर्वसामान्य जनता, वीज ग्राहक, शेतकरी, राज्य शासन यांच्यासह सर्वांच्या हिताची ठरेल. राज्याच्या आर्थिक विकासाला या बदलामुळे फार मोठी मदत होणार आहे. या निर्णयाबद्दल मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मी महावितरणतर्फे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

महावितरण ही देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे. आपली कंपनी सध्या राज्यातील सुमारे ३ कोटी ४० लाख वीज ग्राहकांना सेवा देत आहे. औद्योगिक, घरगुती, वाणिज्यिक ग्राहकांसह ४५ लाख कृषी ग्राहकांनाही महावितरण सेवा देत आहे. आर्थिक विकासासोबत राज्याची विजेची मागणी झपाट्याने वाढत असून महावितरणने मागणीनुसार वीजपुरवठा करण्यात यश मिळविले आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनात महावितरणने विजेचे दर कमी करण्यात यश मिळविले असून २०२९ -३० पर्यंत सलग पाच वर्षे राज्यात घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक तसेच पाणी पुरवठ्यासारख्या सार्वजनिक अशा सर्व ग्राहकांसाठीचा वीजदर कमी होत जाणार आहे. नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून वीजखरेदी खर्चात मोठी कपात करायची आणि त्या आधारे वीजदर कमी करायचे, हे महावितरणचे मॉडेल संपूर्ण देशासाठी अनुकरणीय ठरले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या विविध योजनांच्या आधारे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठिंब्यामुळे महावितरणने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी यशस्वी कामगिरी केली आहे. कृषी पंपांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करण्यासाठीच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या अंमलबजावणीत महावितरणचा प्रमुख वाटा आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत शेतामध्ये सौरकृषी पंप बसविण्याच्या बाबतीत महावितरणने देशात प्रथम क्रमांक मिळविला आहे. एका महिन्यात ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महावितरणने गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड केले आहे. घरगुती वीज ग्राहकांचे वीजबिल शून्य करण्यासाठीच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य देशातील आघाडीच्या राज्यांमध्ये समाविष्ट आहे.

**हितगुज**



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

वीज ग्राहकांच्या सेवेसाठी महावितरण एकापाठोपाठ एक महत्त्वाचे प्रकल्प राबवत असताना आणि कंपनीच्या कामामध्ये मोठे परिवर्तन करत असताना महावितरण आता राज्य सरकारच्या पाठिंब्याने खूप मोठे पाऊल टाकत आहे. राज्य सरकारने परवानगी दिल्यानुसार आता महावितरणची आर्थिक पुनर्रचना करण्यात येत आहे. त्यानुसार महावितरणवरील ३२,६७९ कोटी रुपयांच्या कर्जाची जबाबदारी राज्य सरकार घेणार आहे. त्यामुळे महावितरणवरील तेवढे कर्ज कमी होणार आहे. त्याबदल्यात महावितरणकडील शेतकऱ्यांच्या ३२,६७९ कोटी रुपयांच्या थकबाकीचे लेखाशुद्धीकरण (राईट ऑफ) करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. कृषी थकबाकीची ऊर्वरित देणी महाराष्ट्र विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित व एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड यामध्ये समभाग किंवा अनुदान स्वरूपात वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा मोठ्या प्रमाणात कमी होईल तर कृषी थकबाकीची समस्या सुटेल. याचा एकंदरित परिणाम म्हणून महावितरणची वित्तीय स्थिती अत्यंत भक्कम होणार आहे.

महावितरणकडील कृषी वीज वितरणाशी संबंधित व्यवसाय एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड या स्वतंत्र संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल. ही कंपनी केवळ कृषी ग्राहकांना वीजपुरवठा आणि संबंधित सेवा उपलब्ध करून देण्याचे काम करेल. कृषी वीज कंपनीला मदत म्हणून राज्य सरकारकडून सुमारे २,५०० कोटी रुपयांचे नवीन भांडवल हे कार्यकारी भांडवल म्हणून देण्यात येणार आहे. शेतीसाठीच्या वीज कंपनीला राज्य सरकारने पूर्ण पाठबळ दिले असून केवळ शेतकऱ्यांच्या सेवेसाठी अशा प्रकारची स्वतंत्र वीज कंपनी देशात प्रथमच स्थापन करण्याचा मान महाराष्ट्राला मिळाला आहे.

कृषी व्यवसाय वेगळा केल्यानंतर महावितरण ही कंपनी घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक व इतर (पाणी पुरवठा व तत्सम सार्वजनिक ग्राहक) यांना सेवा देणारी कंपनी बनेल. राज्य सरकारने मदत केल्यामुळे या कंपनीची आर्थिक स्थिती खूपच मजबूत बनेल. या आधारावर कंपनीने इनिशिअल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) द्वारे भांडवली बाजारातून निधी उभारण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे कंपनीला दीर्घकाळासाठी स्थिर उत्पन्न स्त्रोतांतून भांडवल पुरवठा होत राहील. शेअर बाजारातील सूचीकरणाच्या प्रक्रियेत कंपनीच्या व्यवस्थापनात अधिक पारदर्शता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता निर्माण होईल. परिणामी कंपनीची नफ्याकडे वाटचाल होऊन कंपनीला वीज ग्राहकांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. खासगी गुंतवणूक उपलब्ध झाल्यामुळे राज्यातील वीज पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे.

महावितरणच्या लिस्टिंगचा विषय मी कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत समजाऊन सांगितला आहे. त्यावेळी संघटनांच्या नेत्यांचा सकारात्मक प्रतिसाद पाहून आनंद झाला. महावितरणचे शेअर बाजारात सूचीकरण करताना त्याचा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनाही थेट लाभ होणार आहे कारण त्यांना एम्प्लॉई स्टॉक ऑप्शन्सच्या माध्यमातून संधी मिळेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य आर्थिक विकासाच्या बाबतीत घोडदौड करत आहे. राज्यात लाखो कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा ओघ सुरू झाला आहे. एक ट्रिलिअन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याचे राज्याचे उद्दीष्ट आहे. आर्थिक विकासासोबत विजेची मागणी झपाट्याने वाढत जाते. खरंतर उत्तम वीज पुरवठा ही आर्थिक विकासाची प्राथमिक अट झाली आहे. महावितरणच्या उत्पन्नापैकी ८० टक्के निधी हा वीजखरेदी आणि विजेचे वहन यावर खर्च होतो. राज्याची भरभराट होण्यासाठी दर्जेदार वीजपुरवठा आवश्यक आहे व त्यासाठी महावितरण आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे आहे. राज्य सरकारने महावितरणला आर्थिकदृष्ट्या आणखी बळकट करून कंपनीचे शेअर बाजारात सूचीकरण करण्यास मंजुरी देण्यामुळे राज्याच्या गतीमान आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे. म्हणूनच महावितरणमधील ऐतिहासिक परिवर्तन सर्वांच्याच हिताचे आहे.

# तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ व शून्य थकबाकीला प्राधान्य द्या!

## संचालक राजेंद्र पवार यांचे निर्देश




▸▸ सोलापूर मंडलातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभाग, उपविभाग तसेच शाखा कार्यालयातील अधिकाऱ्यांचा गौरव करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता सुनील माने आदी.

**वीज क्षेत्रात** काल केलेल्या कामगिरीवर आज तग धरू शकत नाही. त्यामुळे मागील आर्थिक वर्षात चांगली कामगिरी केली तरीही चालू आर्थिक वर्षात तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ व शून्य थकबाकी या त्रिसूत्रीला प्राधान्य देत काम करण्याचे निर्देश संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले.

सोलापूर येथे आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, अधीक्षक अभियंता सुनील माने यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालक राजेंद्र पवार म्हणाले, राज्याच्या ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने राज्याच्या वीज क्षेत्रात क्रांतिकारी आणि सकारात्मक असे लोकाभिमुख बदल घडून येत आहेत. हे बदल महावितरणला आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि वीज ग्राहकांना जागतिक दर्जाची सेवा देण्यासाठी नव्याने सज्ज करणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

संचालक पवार म्हणाले, तत्पर व दर्जेदार ग्राहक सेवा देण्यासोबतच विविध उपाययोजनांच्या माध्यमातून आपला महसूल आणखी वाढवावा. वीजबिलांची थकबाकी शून्य करण्यास प्राधान्य द्यावे. प्रत्येक कार्यालयाचे दैनंदिन कामकाज अधिक गतिमान व प्रभावी करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

या बैठकीनंतर आयोजित कार्यक्रमात सोलापूर मंडलात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पंढरपूर विभाग, मंगळवेढा, अक्कलकोट-२ आणि नातेपुते उपविभाग तसेच तीन उत्कृष्ट शाखा कार्यालयांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता आशिष खेडीकर व व्यवस्थापक मृदुला पाटील यांनी केले. तर कार्यकारी अभियंता संपत गावडे यांनी आभार मानले. यावेळी मंडल, विभाग, उपविभाग व शाखा कार्यालयांचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून सौर क्रांती: पालकमंत्री प्रकाश आबिटकर

**मुख्यमंत्री** सौर कृषी वाहिनी योजना ही एक सौर क्रांती असून यामुळे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न व अडचणी पटकन सुटत आहेत. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज देणे शक्य होत आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

तांबाळे (ता. भुदरगड) येथे आयोजित गारगोटी, राधानगरी व आजरा उपविभागात करण्यात आलेल्या विविध कामांच्या प्रातिनिधिक लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, अधीक्षक अभियंता गणपत लटपटे, पूनम रोकडे, कार्यकारी अभियंता दत्तात्रय भणगे, तहसीलदार अनिता देशमुख, भुदरगड पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह पाटील, जिल्हा परिषद सदस्या सारिका नांदेकर, अरुण जाधव, परिसरातील पदाधिकारी व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

महावितरणने विविध योजनांतून भुदरगड व राधानगरी तालुक्यात १२४ कोटींची कामे केली आहेत. यामध्ये प्रामुख्याने ७७ कोटींचे २२ मेगावॅटचे सौरऊर्जा प्रकल्प उभारणे, कसबा वाळवा (१०एमव्हीए) व गवसे-हरपवडे (५ एमव्हीए) येथे नवीन रोहित्र उभारणे, आठ ठिकाणांच्या उपकेंद्रांच्या रोहीत्रांची क्षमतावाढ करणे व अतिरिक्त रोहित्र उभारणे यांसह विविध कामांचा यात समावेश आहे.



▸▸ तांबाळे येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून उभारलेल्या प्रकल्पाचे लोकार्पण करताना कोल्हापूरचे पालकमंत्री श्री. प्रकाश आबिटकर. समवेत मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, अधीक्षक अभियंता गणपत लटपटे आदी.

# मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजनेचे प्रकल्प वेळेत पुर्ण करा!

## अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे निर्देश




▸▸ टास्क फोर्सच्या बैठकीत मार्गदर्शन करताना अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला.समवेत मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन) सचिन तालेवार व इतर.

**मा. मुख्यमंत्री** श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सुरू झालेली मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अन्य राज्यांसाठी मार्गदर्शक ठरली आहे. कंत्राटदारांनी या योजनेतील सर्व प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण करावेत; अन्यथा त्यांच्या सुरक्षा ठेवींचे रोखीकरण करून घेण्यात येईल. एजन्सीने सर्व कामाचे अपडेट पोर्टलवर अपलोड करावेत. नको असलेल्या जमिनी शासनास परत कराव्यात. अधिकाधिक सरकारी कार्यालयांवर सौरऊर्जा प्रकल्प बसवावेत, असे निर्देश अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी दिले.

कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय टास्क फोर्सच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन, पोलीस अधीक्षक नीलोत्पल बसू, संचालक (संचालन) सचिन तालेवार, पुणे प्रादेशिक संचालक सुनिल काकडे, सोलर अॅग्रो कंपनीचे सल्लागार श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंता स्वप्निल काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय कुऱ्हाडे आदी उपस्थित होते.

अपर मुख्य सचिव आभा शुक्ला म्हणाल्या, जगातील सर्वात मोठ्या विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांद्वारे शेतीला दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे. अपारंपारिक ऊर्जा निर्मितीत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी पोहचला आहे. ऑफग्रीड सोलर पंप बसविण्यात आपण ६९ टक्के कामांसह देशात प्रथम क्रमांकावर आहोत. राज्यात सोलर ऊर्जा निर्मितीत मोठी वाढ झाली असून वीज नियामक आयोगाने बहूवार्षिक वीज दर सुनावणीच्या माध्यमातून त्याचे लाभ सर्वांपर्यंत पोहचविले आहेत, असे त्यांनी सांगितले.

**औद्योगिक ग्राहकांशी संवाद :** औद्योगिक ग्राहकांशी संवाद साधताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र म्हणाले, उद्योगांनी लोड फॅक्टरवर काम केल्यास याचा लाभ दोन्ही बाजूने होऊ शकतो. राज्यात महावितरणने सोलर स्टोरेजची ४०० मेगावॅटची व्यवस्था केली आहे. भविष्यात ती १२ हजार मेगावॅटपर्यंत वाढवण्यात येणार आहे. राज्यात सुमारे १.४२ कोटी वीज ग्राहकांना स्मार्ट मिटर बसविण्यात आले असून हे मीटर पोस्टपेड असल्याचे त्यांनी आवर्जुन नमुद केले. हे मिटर बसवण्यापूर्वी वीज नोंदणी व देयकांच्या जवळपास १२ टक्के तक्रारी होत्या. आत्ता हे प्रमाण नक्षण्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

# अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते

## थकबाकी शून्य करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव

**सर्व वर्गवारीतील** थकबाकी शून्य करण्याची आव्हानात्मक कामगिरी पार पडणाऱ्या कोल्हापूर परिमंडलातील अकरा उपविभागीय अधिकाऱ्यांना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. राज्यात संपूर्ण थकबाकी शून्य करणारे एकूण अकरा उपविभाग असून हे उपविभाग कोल्हापूर परिमंडलातील आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत हा सन्मान करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना लोकेश चंद्र म्हणाले, कोल्हापूर परिमंडल ग्राहक सेवा, देखभाल दुरुस्ती, थकबाकी वसुली, स्मार्ट मीटर अशा सर्वच निकषांत आघाडीवर आहे. पुढेही असेच चांगले काम करा. येथील ग्राहक हा प्रामाणिक असून त्यांना अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सेवा द्या. मान्सूनपूर्व कामे वेळेत व सुरक्षा साधने वापरून पूर्ण करा. चांगल्या कामाचे इतरांनी अनुकरण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

नागेश बसरीकट्टी (नेसरी), दयानंद अष्टेकर (आजरा), शीतल वनारसे (शिरोळ), शरद परीट (गगनबावडा), गिरीश भोसले (कदमवाडी), दयानंद कमदगी (कळे), सारिका शेळके (कोडोली), रणजीत पाटील (पन्हाळा), समीर अत्तार (परिते), संजय बालटे (सावळज), अंबादास कटकधोंड (खानापूर) यांचा यावेळी गौरव करण्यात आला.




▸▸ अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना उपविभागीय अधिकारी नागेश बसरीगट्टी. समवेत संचालक सचिन तालेवार, मुख्य अभियंता स्वप्नील काटकर व इतर.

यावेळी संचालक (संचालन) सचिन तालेवार, पुणे प्रादेशिक संचालक (प्र) सुनिल काकडे, मुख्य अभियंता स्वप्निल काटकर, विशेष कार्यकारी अधिकारी मंगेश कोहाट, अधीक्षक अभियंते गणपत लटपटे, अमित बोकील, पुनम रोकडे यांच्यासह कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते उपस्थित होते.

# ऊर्जा परिवर्तनातून राज्याच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्राला बळ

## महावितरणचा दोन पुरस्कारांनी सन्मान

**मा. मुख्यमंत्री** श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्याच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये ऊर्जा परिवर्तनाद्वारे दिलेल्या विशेष योगदानाची दखल घेत महावितरणचा 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेसाठी रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर तसेच प्राधान्य दराच्या वीजखरेदीमध्ये ६५ टक्के स्वस्त व शाश्वत अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केल्याबद्दल क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डने गौरविण्यात आले.

भविष्यातील सक्षम अर्थव्यवस्था घडविण्यासाठी इकॉनॉमिक टाइम्सने मुंबई येथे दोन दिवसीय महाराष्ट्र बिझनेस परिषदेचे आयोजन केले होते. त्यात राज्याच्या सायबर सेलचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव यांच्या हस्ते कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे, सहायक अभियंता शुभम चोरमाळे यांनी हे पुरस्कार स्वीकारले.



▸▸ मुंबई येथे आयोजित महाराष्ट्र बिझनेस परिषदेत अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, तांत्रिक सहायक अमोल मोरे, माध्यम सल्लागार डॉ. दिनेश थिटे आदी.

मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० मेगावॅट हरित ऊर्जेची भर पडणार आहे. पर्यायाने राज्याची नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. या ऊर्जा परिवर्तनाला वेग देत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने प्राधान्य दरांवर अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होत आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होण्यास सुरवात झाली आहे. या कामगिरीसाठी महावितरणला क्लीन एनर्जी अँड रिन्यूएबल अडॉप्शन अवॉर्डने गौरविण्यात आले.

तसेच 'मागेल त्याला सौर कृषिपंप' योजनेद्वारे महाराष्ट्राने देशात अव्वल कामगिरी केली असून सर्वाधिक ९ लाख १७ हजार सौर पंप कार्यान्वित केले आहेत. देशात सर्वाधिक ६४ टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये ५ लाख ५ हजार (३४ टक्के) सौर पंप कार्यान्वित झाले आहे. या योजनेतून केवळ ३० दिवसांत ४५ हजार ९११ सौर पंप कार्यान्वित केल्याबद्दल गिनिज वर्ल्ड रेकॉर्डने महावितरणला गौरविण्यात आले आहे. या योजनेतून सुमारे ४२ लाख एकर शेतजमिनीच्या सिंचनासाठी दिवसा व मोफत वीजपुरवठा सुरु झाला आहे. त्याची दखल घेत या योजनेसाठी महावितरणला रिन्यूएबल एनर्जी इनिशिएटिव्ह ऑफ द इयर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# 'इक्मेक्स-२०२६'मध्ये विद्युत सुरक्षेचा जागर

## केंद्रीय राज्यमंत्री श्री. नाईक यांनी केले कौतुक

**इलेक्ट्रिकल** कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या (इक्म) वतीने मुंबईतील गोरेगावच्या बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये 'इक्मेक्स-२०२६' या तीन दिवसीय प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. यात महावितरणच्या प्रदर्शनीला मा. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांनी भेट दिली व विविध योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेतली.

गोरेगाव येथे 'इक्मेक्स-२०२६'चे उद्घाटन मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्या हस्ते झाले. विद्युत कंत्राटदारांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून विद्युत क्षेत्राच्या माध्यमातून प्रगतीस हातभार लावावा असे आवाहन श्री. नाईक यांनी केले. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी सांगितले की, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात ऊर्जा क्षेत्रात राज्याने देशात मोठी आघाडी घेतली आहे. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी शाश्वत व स्वस्त विजेसाठी ऊर्जा परिवर्तनाचा रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठी गती दिली आहे. सौर ऊर्जेच्या योजनांद्वारे सद्यस्थितीत २० लाख ६६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरु झाला आहे. तर पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेमधून आतापर्यंत ५ लाखांवर घरगुती ग्राहकांनी लाभ घेतल्याचे त्यांनी सांगितले.



▸▸ गोरेगाव (मुंबई) येथे इक्मच्या 'इक्मेक्स-२०२६' प्रदर्शनात महावितरणच्या स्टॉलला भेट दिल्यानंतर मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांचे स्वागत करताना संचालक राजेंद्र पवार.

मा. केंद्रीय राज्यमंत्री श्री. नाईक यांनी प्रदर्शनीतील महावितरणच्या दालनाला भेट दिली आणि विविध योजना, उपक्रमांची माहिती घेत कौतुक केले. त्यांचे संचालक राजेंद्र पवार यांनी स्वागत केले व माहिती दिली. यावेळी विशेष कार्य अधिकारी सुधन्वा पत्की (नवी दिल्ली), इक्मचे अध्यक्ष देवांग ठाकूर, सरचिटणीस अमरनाथ पाटील आदींची उपस्थिती होती.

या तीन दिवसीय प्रदर्शनीत महावितरणचे मुख्य अभियंता पंकज तगलपल्लेवार आणि विद्युत सुरक्षा मोहिमेचे समन्वयक डॉ. संतोष पाटणी तसेच अतिरिक्त कार्यकारी अभियंता जितेंद्र राठौर यांनी विशेष सत्रात विद्युत सुरक्षेबाबत प्रबोधन केले. महावितरण प्रदर्शनीद्वारे अधीक्षक अभियंता संजय खंदारे, मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी अजित ईंगतपुरीकर यांच्यासह अभियंता, अधिकाऱ्यांनी विविध योजना व विद्युत सुरक्षेसंदर्भात नागरिकांना माहिती दिली.

## ऊर्जा परिवर्तनातून स्वस्त, शाश्वत विजेकडे वाटचाल

### महावितरणला राष्ट्रीय पुरस्कार



▸▸ नवी दिल्ली येथील स्कॉच समूहाच्या वतीने ऊर्जा परिवर्तनातील उत्कृष्ट कामगिरीसाठी देण्यात आलेला पुरस्कार महावितरणच्या वतीने स्वीकारताना कार्यकारी संचालक भुजंग खंदारे.

**मा. मुख्यमंत्री** श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जा परिवर्तनाद्वारे विद्युत क्षेत्राला नवी दिशा मिळाली आहे. त्यातून स्वस्त व शाश्वत विजेकडे वाटचाल सुरु झाली आहे. या कामगिरीचा सन्मान म्हणून नवी दिल्ली येथे स्कॉच समूहाच्या वतीने महावितरणला राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यकारी संचालक भुजंग खंदारे व कार्यकारी अभियंता रोहित जोगदंड यांनी हा पुरस्कार स्विकारला.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर्सची करण्यासाठी आगामी काळातील ऊर्जेची मागणी लक्षात घेता मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३९ हजार ५०० हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहेत. यात सन २०२९-३० पर्यंत सर्व वर्गवारीतील वीज दर कमी करण्यास मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नुकतीच मंजुरी दिली आहे.

रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅनला अनुसरून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत.

ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट क्षमतेच्या विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांची 'मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०' सुरु करण्यात आली. या योजनेतून ११ लाख ५६ हजार आणि मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतून ८ लाख ८० हजार अशा एकूण २० लाख ३६ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरू झाला आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ५ लाख २ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १९०४ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यांचे मासिक वीजबिलही शून्यावर आले आहे.

## वीज वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्य आवश्यक - संचालक राजेंद्र पवार

**वीज वितरण** हानी आणखी कमी करण्यासाठी अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी सातत्याने कार्यरत असले पाहिजे, असे प्रतिपादन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

कल्याण परिमंडल कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. गत आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव संचालक पवार यांच्या हस्ते करण्यात आला. संचालक पवार म्हणाले, वितरण क्षेत्रात असलेली हानी आणखी कमी केल्यास याचा लाभ आगामी काळात वीज ग्राहकांना होणार आहे. अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी आतापासूनच मान्सूनपूर्व कामे हाती घेऊन ती वेळेत पूर्ण करावीत. जेणेकरून पावसाळ्यात वीज ग्राहकांना त्रास होणार नाही. वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण कमीत कमी वेळेत करावे. मानव संसाधन विभागाने प्रलंबित विषय तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

बैठकीस कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंते अनिल थोरात, विजय फुंदे, मंदार अत्रे, सहाय्यक महाव्यवस्थापक सुशील पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर आदी उपस्थित होते.



▸▸ कल्याण परिमंडलात आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा आदी.

# भऊर येथील सौर प्रकल्पाचे संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते लोकार्पण

## १३१६ कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा



▸▸ भऊर येथे सौर प्रकल्पाच्या विद्युत वाहिनीचे उद्घाटन करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत अधीक्षक अभियंता जगदीश इंगळे व इतर.

**मुख्यमंत्री** सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत मालेगाव मंडलातील देवळा उपविभागात ७ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पामुळे भऊर, बगडू आणि विठेवाडी या परिसरातील १,३१६ शेतीपंपांना दिवसा अखंडित आणि हक्काची वीज मिळणार आहे.

भऊर उपकेंद्रात आयोजित कार्यक्रमात उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधताना संचालक पवार म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात सौर ऊर्जेला मोठी गती मिळाली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचे शासनाचे उद्दिष्ट या प्रकल्पांमुळे यशस्वी होत आहे. यामुळे शेतीच्या विकासासोबत शाश्वत ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल. महावितरण आपल्या ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी सदैव तत्पर आहे. सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांनी आपली देयके वेळेत भरून सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

मालेगाव मंडलाचे अधीक्षक अभियंता जगदीश इंगळे, कार्यकारी अभियंता युवराज पाटील व देवेंद्र उंबरकर, देवळ्याचे उपकार्यकारी अभियंता दिनेश पवार तसेच विठेवाडी, भऊर व बगडूचे सरपंच, उपविभागातील कर्मचारी, आवादा एजन्सीचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संचालक पवार यांनी तत्पूर्वी नाशिक परिमंडल कार्यालयात आढावा बैठक घेतली. त्यानंतर त्यांनी नाशिक शहर, इगतपुरी व पाथर्डी उपविभाग येथे भेटी देऊन अभियंते व जनमित्रांशी वसूली संदर्भात संवाद साधत मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंते उपस्थित होते.

# कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांना प्रतिष्ठेचे पोलीस महासंचालक पदक

## उल्लेखनीय सेवेचा गौरव

**कार्यकारी संचालक** (सुरक्षा व अंमलबजावणी) अपर्णा गिते यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल मानाच्या पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महावितरणसह पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

अपर्णा गिते यांनी आपल्या पोलीस सेवेच्या कारकिर्दीत अत्यंत कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सार्वजनिक हितासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन त्यांना या पदकाने गौरवण्यात आले आहे.



▸▸ अपर्णा गिते

महावितरणमध्ये कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) या पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांनी वीज चोरी रोखणे, अंमलबजावणी व सुरक्षा यंत्रणेत समन्वय साधणे आणि विभागात शिस्तबद्ध कार्यक्षमता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अंमलबजावणी व सुरक्षा विभागाने विविध महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. श्रीमती गिते यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महावितरण प्रशासनाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. जवळपास १५ वर्षांपेक्षा अधिकची निष्कलंक सेवा, गुन्हे शोधण्यात नैपुण्य, आणि उत्कृष्ट पोलीस कामगिरीच्या सन्मानार्थ हे पदक प्रदान करण्यात येते.

# ऊर्जा क्षेत्रात इतिहासावर जगता येत नाही, अधिक जोमाने कामाला लागा!

## संचालक राजेंद्र पवार

**ग्राहकाभिमुख** सेवा देणे, वितरण हानी निचांकी स्तरावर आणणे आणि महसूल वाढीसह थकबाकी शून्य करण्याच्या उद्दिष्टांना अमरावती परिमंडलाने यशस्वी प्रतिसाद दिला आहे. गत आर्थिक वर्षात या परिमंडलाने राज्यात तिसरा क्रमांक पटकावला, ही कौतुकास्पद बाब आहे. मात्र, ऊर्जा क्षेत्रात केवळ मागील कामगिरीच्या यशावर म्हणजेच इतिहासावर जगता येत नाही. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी अधिक जोमाने, एकजुटीने आणि कामात सातत्य राखून महावितरणला प्रगतीपथावर न्यावे, असे प्रतिपादन संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले.

अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात अमरावती परिमंडलातील गत आर्थिक वर्षातील कामगिरीचा गौरव करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. मुख्य अभियंते अशोक साळुंके, राजेश नाईक, अधीक्षक अभियंते दीपक देवहाते, प्रवीण दरोली, दीपाली माडेलवार यांची यावेळी उपस्थिती होती. या गौरव कार्यक्रमात अमरावती परिमंडलांतर्गत विविध मापदंडांवर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या १४ कार्यालयांना संचालक पवार यांच्या हस्ते फिरता चषक व संबंधित अधिकाऱ्यांना प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात आले. यात अमरावती जिल्ह्यातील ९ तर यवतमाळ जिल्ह्यातील ५ कार्यालयांचा समोवश आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना संचालक पवार म्हणाले, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महावितरणच्या कार्यपद्धतीत सकारात्मक आणि क्रांतिकारी बदल घडले आहेत. या बदलांमुळे संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहे. तसेच ग्राहकांना जागतिक दर्जाची सेवा देणे शक्य होत आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांद्वारे राज्यातील सुमारे २३ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. तसेच प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत महाराष्ट्राने ५.४२ लाख घरांवर सौर प्रकल्प कार्यान्वित केल्याचे त्यांनी सांगितले.




▸▸ अमरावती परिमंडलातील गौरव सोहळ्यात पुरस्कार वितरण करताना संचालक राजेंद्र पवार. समवेत मुख्य अभियंते अशोक साळुंके, राजेश नाईक व इतर अधिकारी.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांनी केले तर पुरस्कारांचे वाचन वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा यांनी केले. सूत्रसंचालन विकास बांबल व आद्यश्री कांबे यांनी केले. तर उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे यांनी आभार मानले.

**वसुंधरा दिनानिमित्त वृक्षारोपण:** अचलपूर दौऱ्यात संचालक पवार यांनी चिखलदरा येथील कार्यालयाला भेट देत कामकाजाचा आढावा घेतला. तर जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून त्यांच्या हस्ते चिखलदरा विश्रामगृह परिसरात ११ आंबा व ११ फणसाच्या रोपट्यांचे रोपण करण्यात आले. तसेच अचलपूर विभागीय कार्यालय परिसरातही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

# बामणी येथील सौर प्रकल्पास विभागीय आयुक्तांची भेट



▸▸ बामणी (ता. कागल) येथील सौर प्रकल्पाची पाहणी करताना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार. समवेत जिल्हाधिकारी अमोल येडगे, कार्यकारी अभियंता दत्तात्रय भणगे आदी.

**मुख्यमंत्री** सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत कागल तालुक्यातील बामणी येथे ५ हेक्टरवर उभारण्यात आलेल्या प्रकल्पास पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी भेट देऊन पाहणी केली. या प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांचे दिवसा वीज मिळण्याचे स्वप्न पूर्ण झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पाहणी दरम्यान विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले की, खासगी जागा भाडेतत्त्वावर घेताना शासनाकडून प्रती हेक्टर वार्षिक १ लाख २५ हजार रुपये दिले जाणार असून, यात दरवर्षी ३ टक्के वाढ केली जाणार आहे. ज्या ठिकाणी पडीक जमीन किंवा गायरान जमीन उपलब्ध आहे, तिथे असे प्रकल्प उभारता येतील. या योजनेत कोल्हापूर जिल्ह्याची कामगिरी उत्तम असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी अमोल येडगे, कार्यकारी अभियंता दत्तात्रय भणगे, राधानगरी–कागलचे उपविभागीय अधिकारी प्रसाद चौगुले, कागलचे तहसीलदार अमरदीप वाकडे, बामणीचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच महसूल व महावितरणचे अधिकारी–कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# सौर ऊर्जेतून कृषिपंपाना वीज देण्यात महावितरणची कामगिरी दिशादर्शक

## मध्यप्रदेश वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून कौतुकोद्गार



▸▸ प्रकाशगड येथे मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती देताना संचालक सचिन तालेवार, तत्कालिन कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार आदी.

**मुख्यमंत्री** सौर कृषिवाहिनी योजना २.० तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महावितरणची कामगिरी इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या या योजनांची माहिती घेतल्यानंतर मध्यप्रदेश वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या पथकाकडून हे गौरवोद्गार काढण्यात आले.

मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या पथकाने अभ्यास दौऱ्यात प्रकाशगड येथे सौर ऊर्जेतून कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती घेतली. संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, तत्कालिन कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी सादरीकरणाच्या माध्मातून योजनांची सविस्तर माहिती दिली. मध्यप्रदेशच्या पथकात कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुदीप सिंग कनुजा, सहाय्यक महाव्यवस्थापक धिरज कुमार मुनिया, अधीक्षक अभियंता चिंतामणी ठाकर, व्यवस्थापक शंकर नारायण अग्रवाल, विनोद राऊत यांचा समावेश होता.

जगातील सर्वांत मोठा १६ हजार मेगावॅट विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत ३ हजार १८७ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १२ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा ४ हजार ७७९ मेगावॅट विजेचा पुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे.

याशिवाय मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनेसह विविध योजनांमधून राज्यात ९ लाख १७ हजार ५८७ कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. देशभरात बसवण्यात आलेल्या एकूण ऑफ ग्रीड सौर कृषिपंपांपैकी ६४ टक्के कृषिपंप एकट्या महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीतून राज्यातील ३२ लाख ७६ हजार म्हणजेच एकूण कृषिपंपांपैकी ७३ टक्के कृषिपंपांना सध्या दिवसा वीज पुरवठा सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# सबॉर्डिनेट इंजिनिअर्स पतसंस्थेला

## राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार




▸▸ राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार-२०२५ मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन पतसंस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव लाड, सचिव रविंद्र ननवरे आदी.

**पुण्याच्या सबॉर्डिनेट** इंजिनिअर्स असोसिएशन (एमएसईबी) को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला राज्यस्तरीय दीपस्तंभ पुरस्कार-२०२५ मिळाला. या पतसंस्थेला सलग सातव्यांदा हा बहुमान प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मुंबईच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे आर्थिक निकष, आधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला वापर, प्रभावी वसुली यंत्रणा, सहकार चळवळीसाठी दिलेले योगदान आणि पतसंस्थेने केलेले सामाजिक कार्य या आधारे ही निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष शिवाजीराव लाड यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे संस्थेस प्रथम क्रमांक मिळविण्यात पतसंस्थेने सातत्य टिकवले आहे.

# श्रीजा सलपे यांचे यश



**बेंगलोर** येथील स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्थानच्या वतीने घेण्यात आलेल्या हिमालया योगा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा-२०२५ मध्ये श्रीजा सिद्धेश सलपे यांनी सुवर्णपदक पटकावले. ३६ ते ४५ वयोगटात त्यांनी महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व केले. रत्नागिरी विभागीय कार्यालयात त्या निम्नस्तर लिपीक (मांस) पदावर कार्यरत आहेत.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)